**महाऊर्जास पदनिर्देशित संस्था म्हणुन ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय पुरस्कार आणि देशात दुसरे स्थान कायम**

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेस ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी करण्याऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकार पातळीवर हा पुरस्कार देण्यात येतो. सदर पुरस्काराचे वितरण विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे दि.१४ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात करण्यात आले. महाऊर्जाचे महासंचालक श्री. कांतीलाल उमाप, भा प्र से यांनी हा पुरस्कार स्विकारला.

महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धन अधिनियम २००१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जास) पदनिर्देशित संस्था म्हणुन शासनाने अधिसूचित केले आहे. ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमतेशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महाऊर्जा आघाडीवर आहे.

महाऊर्जाने महासंचालक श्री. कांतीलाल उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा संवर्धन कार्यक्रमास विशेष महत्व दिले आहे. विविध क्षेत्रामध्ये ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्यासाठी योजना राबविण्यात येऊन ऊर्जा संवर्धन, ऊर्जा बचत व ऊर्जा कार्यक्षमता यामधील तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धनाचे महत्व ओळखून महाऊर्जाकडून प्रस्तावित केलेल्या धोरणांना व योजनांना मान्यता दिली आहे.

महाऊर्जाच्या पुढाकारने राज्यातील विविध घटकांनी केलेल्या ऊर्जा संवर्धनाच्या उपाययोजनामुळे सुमारे ३२७ मे.वॉ. इतक्या समतुल्य स्थापित क्षमतेची बचत करणे शक्य झाले आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

वृत्तपत्राचे नाव सकाळ दि. १७/१२/२०१९

# महाऊर्जास राष्ट्रीय पुरस्कार

## देशात दुसरे स्थान कायम

**पुणे, ता. १६ : महाराष्ट्र ऊर्जाविकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र सरकारच्या संस्थेस ऊर्जासंवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जासंवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो.**




**नवी दिल्ली : ऊर्जा संवर्धनाचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना महासंचालक कांतिलाल उमाप. समवेत मान्यवर.**

सदर पुरस्काराचे वितरण विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे १४ डिसेंबर रोजी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात करण्यात आले. महाऊर्जाचे महासंचालक कांतिलाल उमाप यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

महाराष्ट्र सरकारने ऊर्जासंवर्धन अधिनियम २००१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जाविकास अभिकरणास (महाऊर्जा) पदनिर्देशित संस्था म्हणून सरकारने अधिसूचित केले आहे. ऊर्जासंवर्धन आणि ऊर्जाकार्यक्षमतेशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महाऊर्जा आघाडीवर आहे. महाऊर्जाने महासंचालक कांतिलाल उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जासंवर्धन कार्यक्रमास विशेष महत्त्व दिले आहे. विविध क्षेत्रांमध्ये ऊर्जाकार्यक्षमता वाढविण्यासाठी योजना राबविण्यात आल्या. त्यात ऊर्जासंवर्धन, ऊर्जाबचत व ऊर्जाकार्यक्षमता, यामधील तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र सरकारने ऊर्जासंवर्धनाचे महत्त्व ओळखून महाऊर्जाकडून प्रस्तावित केलेल्या धोरणांना व योजनांना मान्यता दिली आहे. महाऊर्जाच्या पुढाकाराने राज्यातील विविध घटकांनी केलेल्या ऊर्जासंवर्धनाच्या उपाययोजनांमुळे सुमारे ३२७ मेगावॉट विजेची बचत करणे शक्य झाले आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

वृत्तपत्राचे नाव महाराष्ट्र टाईम्स दि.16/12/२०१९

# 'महाऊर्जा' संस्थेला राष्ट्रीय पुरस्कार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या राज्य सरकारच्या संस्थेस राष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जा संवर्धनासाठी कार्यरत घटकांना केंद्र सरकारतर्फे हा पुरस्कार दिला जातो. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे शनिवारी (१४ डिसेंबर) झालेल्या विशेष कार्यक्रमात 'महाऊर्जा'चे महासंचालक कांतिलाल उमाप यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

ऊर्जा संवर्धन अधिनियम २००१ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीचे काम 'महाऊर्जा'तर्फे केले जाते, तसेच ऊर्जा संवर्धन व ऊर्जा कार्यक्षमतेशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. विविध क्षेत्रात ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्यासाठी संस्थेतर्फे योजना राबविण्यात येत असून, ऊर्जा संवर्धनासह बचत व कार्यक्षमतेसाठी तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन दिले जात आहे.

'महाऊर्जा'च्या पुढाकारानेच राज्यात ३२७ मेगावॉट क्षमतेची बचत शक्य झाली आहे.



राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना 'महाऊर्जा'चे महासंचालक कांतिलाल उमाप.

**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**

वृत्तपत्राचे नाव अॅग्रोवन दि. 16/12/२०१९



**नवी दिल्ली : ऊर्जा संवर्धन आणि कार्यक्षम उपक्रमासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणला (महाऊर्जा) राष्ट्रीय पातळीवरील द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री आर. के. सिंग यांच्या हस्ते 'महाऊर्जा'चे महासंचालक कांतीलाल उमाप यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**

# ऊर्जा संवर्धनासाठी 'महाऊर्जा'ला राष्ट्रीय पुरस्कार

**पुणे :** ऊर्जा संवर्धन आणि कार्यक्षम उपक्रमासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणला (महाऊर्जा) राष्ट्रीय पातळीवरील द्वितीय पारितोषिक मिळाले आहे. शनिवारी (ता. १४) ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त नवी दिल्लीतील विज्ञान भवनात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री आर. के. सिंग यांच्या हस्ते महाऊर्जाचे महासंचालक कांतीलाल उमाप यांनी पुरस्कार स्वीकारला.

'महाऊर्जा' २००१ पासून अपारंपरिक ऊर्जानिर्मिती संवर्धन आणि कार्यक्षम उपक्रम राबवित आहे. या माध्यमातून महासंचालक उमाप यांनी अपारंपरिक ऊर्जा वापराला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांची आखणी आणि अंमलबजावणी केली आहे. 'महाऊर्जा'ने आखलेल्या धोरणांचा स्वीकार राज्य सरकारने केला असल्याने, महाराष्ट्र राज्य अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात आघाडीवर राहिले आहे. 'महाऊर्जा'मुळे राज्यातील विविध प्रकल्पाअंतर्गत ३२७ मेगावॅट ऊर्जेची बचत होत आहे.

> "अपारंपरिक ऊर्जानिर्मिती ही वसुंधरा संवर्धनासाठी गरजेची असून, केंद्र सरकारच्या या क्षेत्रासाठीच्या धोरणांची अंमलबजावणी, प्रचार आणि प्रसारासाठी महाऊर्जा (मेडा) नेहमीच देशपातळीवर अग्रणी राहिले आहे. यामध्ये 'महाऊर्जा'च्या माजी महासंचालकांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांचे योगदान आहे.
>
> **– कांतीलाल उमाप,**
> महासंचालक, महाऊर्जा

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

वृत्तपत्राचे नाव केसरी दि. १७/१२/२०१९

# राष्ट्रीय पुरस्काराने महाऊर्जाचा गौरव



महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेस ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. विज्ञान भवन, नवी दिल्लीत विज्ञान भवनमध्ये नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात पुरस्कार वितरण झाले. महाऊर्जाचे महासंचालक कांतीलाल उमाप यांनी पुरस्कार स्वीकारला. महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धन अधिनियम २००१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जास) पदनिर्देशित संस्था म्हणून अधिसूचित केले आहे. ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमतेशी संबंधित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महाऊर्जा आघाडीवर आहे. महाऊर्जाने महासंचालक उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा संवर्धन कार्यक्रमास विशेष महत्त्व दिले आहे.

# महाऊर्जाला राष्ट्रीयस्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार



**पुणे** : महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेस ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीयस्तरावर दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकार पातळीवर हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कार वितरण नुकतेच नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात करण्यात आले. महाऊर्जाचे महासंचालक कांतिलाल उमाप यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महाऊर्जाने कांतिलाल उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा संवर्धन कार्यक्रमास विशेष महत्त्व दिले आहे. विविध क्षेत्रामध्ये ऊर्जा कार्यक्षमत वाढविण्यासाठी योजना राबविण्यात येऊन ऊर्जा संवर्धन, ऊर्जा बचत व ऊर्जा कार्यक्षमता यामधील तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देण्यात देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व ओळखून महाऊर्जाकडून प्रस्तावित केलेल्या धोरणांना व योजनांना मान्यता दिली आहे. महाऊर्जाच्या पुढाकाराने राज्यातील विविध घटकांनी केलेल्या ऊर्जा संवर्धनाच्या उपाययोजनामुळे सुमारे ३२७ मे.वॉ. इतक्या समतुल्य स्थापित क्षमतेची बचत करणे शक्य झाले आहे.